# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त बुधवार दिनांक १ मे, २०२४, सकाळी ८.०० वाजता विद्यापीठाच्या आवारात मुख्य कार्यालयासमोर मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनी समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

संचालक
विद्यार्थी विकास

संदर्भ क्रं. शिवाजीवि/विद्यार्थी विकास/०९
दिनांक : ३०/०४/२०२४

प्रति,

१. शिवाजी विद्यापीठ परिसरातील सर्व अधिविभागप्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी/विद्यार्थीनींना व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
३. मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांनी संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी संपर्क साधावा तसेच सदरच्या कार्यक्रमाच्यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व विद्यापीठ गीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
४. वाहन विभागाने अधिविभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार, वाद्ये आणण्यासाठी वाहनाची सोय करावी.
५. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदनाच्या ठिकाणी तसेच रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
६. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठीकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची देखभाल पहावी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
७. नोटीस बोर्डवर लावणेसाठी –
   १) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३ २) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३
   ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
   ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह
८. उद्यान विभागप्रमुखांनी ध्वजारोहण परिसरातील बागेची ठाकठिकता व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार आणण्याची व्यवस्था करावी व अभियांत्रिकी विभागाने पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
९. श्री. डी. आर. चौगुले व श्री. के. पी. पुजारी, जमादार यांनी आस्थापना विभागाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार चार शिपाई या विभागाच्या मदतीस देण्याचे आहेत.
१०. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहण प्रसंगी ध्वज हाताळण्यासाठी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

— 000 —